**MaharashtraTimes**
**Title :**
**Author :**
**Location :**
**Article Date : 12/04/2014**

# समर्थ रामदासांचे साहित्य एका क्लिकवर उपलब्ध

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



बलशाली आणि चारित्र्यसंपन्न महाराष्ट्राची शिकवण देणाऱ्या समर्थ रामदास यांचा समग्र साहित्य वेबसाइटच्या माध्यमातून एका क्लिकवर आले आहे. समर्थांच्या साहित्यासह त्यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञानाबाबत अभ्यासकांनी लिहिलेले लेख, ऑडिओ-व्हिडिओ साहित्याचाही या वेबसाइटवर समावेश असून, या भाषांमध्ये अनुवादित झालेले साहित्यही या वेबसाइटवर संग्रहित करण्यात आले आहे.

समर्थ रामदास यांचा चतु:शताब्दी जन्मोत्सव २००८मध्ये साजरी करण्यात आला. त्यानिमित्ताने डॉ. राम साठ्ये यांनी समर्थांवर आधारित वेबसाइट करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी डॉ. पराग माणकीकर यांची मदत घेतली. सुरुवातीला वेबसाइट तयार करताना फारच थोडे साहित्य उपलब्ध होते. मात्र, टप्प्याटप्प्याने साहित्य मिळवून ते वेबसाइटवर अपलोड करण्यात आले. http://www.samarthramdas400.in या वेबसाइटवर हे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

डॉ. साठ्ये आणि डॉ. माणकीकर यांनी वेबसाइटची माहिती 'मटा'ला दिली. 'समर्थांचा जन्म १६०८मध्ये झाला. २००८मध्ये त्याचे चतु:शताब्दी वर्ष होते. त्यानिमित्ताने काहीतरी वेगळा उपक्रम करण्याची कल्पना होती. त्यात वेबसाइट तयार करण्याची कल्पना पुढे आली. सुमारे दीड वर्षे साहित्य जमवून वेबसाइट सुरू करण्यात आली. कोणताही व्यावसायिक हेतू न ठेवता समर्थांचे साहित्य देण्याचे आम्ही ठरवले. वेबसाइटवरून डाउनलोड होत असल्याने आमचा हेतू साध्य होत आहे,' असे डॉ. साठ्ये यांनी सांगितले.

'वेबसाइटवरील साहित्यात काही दुर्मिळ लेखांचाही समावेश आहे. विविध भाषांमध्ये साहित्य असल्याने वेबसाइटला प्रतिसाद मिळत आहे,' असे माणकीकर यांनी स्पष्ट केले.

- **विनामूल्य डाउनलोड**

  सध्या या वेबसाइटवर चार जीबी डाटा आहे. त्यात पीडीएफ, ऑडिओ-व्हिडिओ साहित्याचा समावेश आहे. संपूर्ण दासबोध ऑडिओ स्वरूपात उपलब्ध करण्यात आला आहे. हे साहित्य विनामूल्य डाउनलोड करता येते.

- **अँड्रॉइड ॲप्लिकेशनही..**

  समर्थ रामदासांचे तत्त्वज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी वेबसाइटसह 'स्मार्ट' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. स्मार्टफोनच्या वाढत्या वापराला डोळ्यासमोर ठेवून ही वेबसाइट अँड्रॉइड ॲप्लिकेशनच्या स्वरुपातही तयार करण्यात आली आहे. त्यामुळे स्मार्टफोनधारकांना कुठेही, केव्हाही समर्थांच्या साहित्याचा आनंद घेता येऊ शकेल.